**जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी (महाराष्ट्र शासन), यांनी प्रस्तावित केलेल्या परभणी जिल्हयातील गंगाखेड तालुक्यातील झोला, मैराळसावंगी व दुसलगांव, पालम तालुक्यातील रावराजुर तसेच पुर्णा तालुक्यातील पिंपळगाव, संदलापुर व कानडखेड येथील प्रस्तावित असलेल्या वाळूघाटाच्या संदर्भात दिनांक २४/११/२०२१ रोजी सकाळी ११:०० वा. तहसिल कार्यालय गंगाखेड, ता. गंगाखेड, जि. परभणी येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्तांत :**

.........................................................................................................................................

जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी (महाराष्ट्र शासन), यांनी प्रस्तावित केलेल्या परभणी जिल्हयातील गंगाखेड तालुक्यातील झोला, मैराळसावंगी व दुसलगांव, पालम तालुक्यातील रावराजुर तसेच पुर्णा तालुक्यातील पिंपळगाव, संदलापुर व कानडखेड येथील प्रस्तावित असलेल्या वाळूघाटाच्या संदर्भात दिनांक २४/११/२०२१ रोजी सकाळी ११:०० वा. तहसिल कार्यालय गंगाखेड, ता. गंगाखेड, जि. परभणी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात आली होती.

जाहीर लोकसुनावणीसाठी खालील समिती सदस्य उपस्थित होते.

१. **श्री. महेश वडदकर**
निवासी उप जिल्हाधिकारी परभणी.
तथा
अप्पर जिल्हादंडाधिकारी, परभणी : अध्यक्ष

२. **श्री. सो.म. कुरमूडे**
उप-प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, परभणी : समन्वयक

परभणी जिल्हयातील गंगाखेड, पालम व पुर्णा तालुक्यात प्रस्तावित असलेल्या वाळुघाटाच्या पर्यावरण विषयक मंजूरीसाठी जाहीर लोक सुनावणीसाठी मा. जिल्हाधिकारी, परभणी यांनी त्यांचे प्रतिनिधी म्हणून श्री. महेश वडदकर, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अति. जिल्हादंडाधिकारी, परभणी यांची नियुक्ती करून त्यांच्या अध्यक्षतेखाली सदर सुनावणीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सुचविले. त्या नुसार सदर सुनावणी मा. निवासी उपजिल्हाधिकारी,

परभणी यांचे अध्यक्षतेखाली दि. २४ नोंव्हेंबर २०२१ रोजी सकाळी ११:०० वाजता तहसिल कार्यालय गंगाखेड येथे आयोजित करण्यात आली होती.

श्री. सो.म. कुरमुडे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ परभणी तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करुन जनसुनावणी समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली. भारत सरकार, पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसुचना क्रं. एस.ओ.१५३३ दि. १४/०९/२००६ (दि. ०१/१२/२००९ सुधारित) नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका टिप्पणी आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोकसुनावणीचे आयोजन केले असल्याचे नमूद केले. तसेच जिल्हा खनिकर्म अधिकारी, परभणी यांचा, परभणी जिल्हयातील वाळू घाटाबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दि. १४/१०/२०२१ रोजी प्राप्त झाला होता. त्याअनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, परभणी यांनी सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी तहसिल कार्यालय, गंगाखेड येथे घेण्याबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने आजची जाहीर लोक सुनावणी घेण्यात येत आहे. सदर बाबतची जाहीर सुचना दि. २०/१०/२०२१ रोजीच्या दै. सकाळ (मराठी) व द टाईम्स ऑफ इंडीया (इंग्रजी) या वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आली होती. सदर वाळूघाटांच्या परिसरामधील रहिवाशी, पर्यावरण विषयी काम करणा-या संस्था, विस्तापित होणारे किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सुचना, टिका टिप्पणी लेखी स्वरुपात ३० दिवसांपर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, परभणी येथे लिखीत स्वरूपात पाठविण्याचे वा इमेलद्वारे पाठविण्याचे नमुद करण्यात आले होते.

सदर प्रकल्पाविषयी व पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या सारांशाची माहिती असलेले दस्तऐवज (मराठी व इंग्रजी) मध्ये खालील कार्यालयामध्ये उपलब्ध करुन देण्यात आले होते.

- जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी.
- जिल्हा उदयोग केंद्र, परभणी.
- जिल्हा परिषद, परभणी.
- तहसिलदार, तहसिल कार्यालय गंगाखेड, पालम व पूर्णा.
- ग्रामपंचायत कार्यालय — (अ) पिंपळगांव (बाळापुर), संदलापुर व कानडखेड, ता. पुर्णा (ब) झोला, मैराळसांवगी व दुसलगांव, ता. गंगाखेड (क) रावराजुर, ता. पालम.
- उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, परभणी.
- प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, औरंगाबाद.

* (मुख्यालय),महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ मुंबई.
* पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
* प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नागपूर.

श्री. सो.म. कुरमुडे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ परभणी तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी नमुद केले की, सदर जाहीर सुचनेस अनुसरुन अदयाप पर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ परभणी यांचेकडे वाळूघाटाबाबत कुठलेही आक्षेप, टिका टिप्पणी, तोंडी किंवा लेखी स्वरुपात (इमेलद्वारे) प्राप्त झालेले नाहीत. त्यांनी सांगितले की, जर कूणाला सदर प्रकल्पासंबंधी पर्यावरण विषयक काही विचार, सुचना टिप्पणी, इ. नोंदवायचे असतील तर ते इथे सूध्दा आज मौखीक अथवा लिखित स्वरूपात नोंदवू शकतात. प्रश्न फक्त पर्यावरण विषयकच विचारले जावेत अशी त्यांनी विनंती केली. जेणेकरून प्रकल्प प्रवर्तकातर्फे समाधानकारकरित्या योग्य मार्गदर्शन केले जाईल व शंकांचे निरसन केले जाईल व त्याची इतिवृतामध्ये नोंद घेतली जाईल आणि सदर जाहीर लोकसूनावणीच्या चित्रफितीसहीत ते पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन येथे पूढिल योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल. त्यानंतर सदर जाहीर लोकसूनावणीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने, त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्यास विनंती केली.

त्यास अनुसरुन प्रकल्पाचे प्रतिनिधी मे. मंत्राज ग्रीन रिसोर्सेस लि. नाशिक चे श्री. रामेश्वर कुंडलिक बोरकर, प्रकल्प सल्लागार यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की, प्रकल्पाचा तपशील, पर्यावरणीय प्रदूषण, योजना साधने, करण्यात येणा-या उपाय योजना इं. समावेश होता. आणि पूढे सांगितले की, महाराष्ट्र शासन पत्र क्रमांक संकीर्ण- २०१९/ पी.के.०१/ता.के. ३ दि. ३ डिसेंबर, २०१९ अन्वये ५ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्राच्या खाणींसाठी सार्वजनिक सुनावणी घ्यावी लागते. परभणी जिल्हयातील गंगाखेड, पालम व पुर्णा तालुक्यात प्रस्तावित असलेल्या वाळूघाटासाठी पर्यावरणविषयक मंजूरी मागविण्यात आली आहे. सदर मायनिंगमध्ये ड्रिलिंग आणि ब्लास्टिंगविना ओपनकास्ट मॅन्युअल पध्दतीचा अवलंब करण्यात येईल. केवळ कुदळ, घमेले यासारख्या हातांच्या साधनांचा उपयोग केला जाईल. केवळ कोरडया नदीच्या पात्रातून वाळू उत्खनन केले जाईल. वायू प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू वाहतुकीसाठी वापरल्या जाणा-या कच्च्या रोडवर नियमित पाणी शिंपडले जाईल. टॅक्टर ट्रॉली

द्वारे वाळूची वाहतूक ताडपत्रीने झाकुन करण्यात येईल. ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी खाणकाम आणि वाळू वाहतुक केवळ दिवसाच्या वेळीच केली जाईल. जल प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू उत्खनन केवळ कोरडया नदीच्या बेडवरच केले जाईल. खाण खडयाची खोली नदीच्या पाण्याच्या पातळीवरच ठेवली जाईल. निष्क्रीय वाहिन्या तयार करण्यासाठी नदीचे प्रवाह वळविले जाणार नाहीत, नदीत वाहने धुण्यास मनाई करण्यात येईल, खाणकामातून कोणतेही सांडपाणी तयार होणार नाही याची काळजी घेण्यात येईल. कामगारांना मोबाईल टॉयलेटची सोय करण्यात येईल, पावसाळयात आणि पूरात उत्खनन टाळले जाईल यामुळे वाळू उपसा पुन्हा भरु शकेल. जमीनीचे पर्यावरण राखण्यासाठी खाणकाम परवानगी घेण्याच्या क्षमतेपेक्षा जास्त होणार नाही, नदीकाठ आणि जवळपास मोकळया जागांवर वृक्षारोपन विकसित केले जाईल. व्यावसायीक आरोग्य सुरक्षा व्यवस्थापनासाठी खाण चालकांना वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे दिली जातील. खाण साईटवर प्रथमोपचार किट प्रदान केले जाईल. पर्यावरणाची हानी होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. तसेच वाळूघाटावर सीसीटीवी कॅमेरे बसविण्यात येतील.

सदर वाळुघाटाची माहिती खालील प्रमाणे आहे.

**तालुका गंगाखेड-**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र (हे) | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | झोला | खासरा क्रं. १९, २०, २२, २३, २४, ५४, ५६, ५३, ५८ | ४५७x४०x०.८० | १.८२ | ५१६७ |
| २ | मैराळसावंगी | खासरा क्रं. १७२, १७३, १७४, १७५, १८७ | ६४५x३६x०.६० | २.३२ | ४९२३ |
| ३ | दुसलगाव | खासरा क्रं. २९, ३३, ३४, ३५ | ४५७x३५x०.७० | १.५९ | ३९५६ |

**तालुका पालम-**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र (हे) | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | रावराजुर | खासरा क्रं. ७, २८, ९, १०, ११, २२, २३, २९ | ९००x५०x०.५० | ४.५० | ७९५१ |

तालुका पुर्णा-

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र (हे) | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपळगाव बाळापुर | खासरा क्रं. १३३, १५०, १५१, १५२, १५३, १५४, १५५, १५६, १९२, १९३, १९४, १९५,१९६, १९७ | ८५०x४०x०.६० | ३.४० | ७२०८ |
| २ | संदलापुर | खासरा क्रं. १०, ०९, ०८, ०७, ०६, ०५ | ९००x३०x०.४० | २.७० | ३८१६ |
| 3 | कानडखेड | खासरा क्रं. ३३३, ३३२, ३३०, ३२९, ३२४, ३२५ | ६००x३०x०.५५ | १.८० | ३४९८ |

सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डींग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तांतात नोंद करण्यात आली आहे.

प्रस्तावित प्रकल्पा विषयीचे सादरीकरण झाल्यानंतर श्री. सो.म. कुरमुडे, समन्वयक यांनी उपस्थितांना आपल्या लेखी/तोंडी काही टिका टिप्पणी असतील तर त्या मांडाव्यात जेणेकरुन पर्यावरण विषयक जनसुनावणीच्या इतिवृत्तात त्याची नोंद घेणे शक्य होईल असे नमुद केले. तसेच प्रथम आपण आपले नांव, गावाचे नाव सांगावे नंतर आपले काय म्हणणे आहे ते या ठिकाणी नोंदवावे अशी विनंती केली.

सदर जाहीर लोकसुनावणी दरम्यान परभणी जिल्हयातील गंगाखेड, पालम व पूर्णा तालूक्यातील संबंधीत भागातील सार्वजनिक सहभागींनी सदर प्रकल्पासंबंधित काही प्रश्न उपस्थित केले ते खालील प्रमाणे आहेत.

१. **श्री. प्रसाद ज्ञानोबा मुरकुटे, झोला, ता. गंगाखेड, जि. परभणी**
   यांनी सांगितले कि, या वाळुघाटा संबंधी काहीही तक्रार नाही व सदर वाळूघाटाबाबत सहमती दर्शवली.
२. **श्री श्रीराम जाधव, पोलीस पाटील, दुसलगाव, ता. गंगाखेड, जि. परभणी**
   यांनी सांगितले कि, या वाळुघाटा संबंधी काहीही तक्रार नाही व सदर वाळूघाटाबाबत सहमती दर्शवली.
३. **श्री भरत लक्ष्मण लंगोटे, दुसलगांव, ता. गंगाखेड जि. परभणी**

यांनी सांगितले कि, या वाळुघाटा संबंधी काहीही तक्रार नाही व सदर वाळूघाटाबाबत सहमती दर्शवली.

४. **श्री व्यंकट दशरथ काळे, रावराजुर, ता. पालम, जि. परभणी**

यांनी सांगितले कि, या वाळुघाटा संबंधी काहीही तक्रार नाही व सदर वाळूघाटाबाबत सहमती दर्शवली..

५. **श्री चंदु भिवाजी पवार, रा. रावराजुर, ता. पालम, जि. परभणी**

यांनी सांगितले की, सन २०१८-१९ मध्ये वाळु धक्याचे पैसे अजुनही आलेले नाहीत. याबाबत श्री महेश वडदकर यांनी याबाबत चौकशी करण्यासाठी संबंधित तहसिलदार व खनिकर्म अधिकारी यांना सूचित केले. तसेच उत्खनन करत असताना लिलावधारकाने नियम व अटी लागू केलेल्या आहेत त्याचे तंतोतंत पालण करावे व त्यानूसार वाळू उत्खनन करावी तसेच वाहतूकीमूळे गावातील रस्ते खराब होणार नाहीत व वाहतूकीमूळे उडणारी धूळ निर्माण होणार नाही. तसेच झाडे लावण्याविषयी असे सांगितले की, कंत्राटदार यांच्यामार्फत झाडे न लावता ते ग्रामपंचयात कडून लावावीत जेणेकरून झाडांची संगोपन, देखभाल ग्रामपंचायत कार्यालयाकडून करता येणे शक्य होईल.

श्री. सो.म. कुरमुडे, यांनी उपस्थितांना विचारले की, अजुनही कोणाला कांही सुचना, आक्षेप मांडावयाचे असतील तर ते मांडू शकतात. परंतु सहभागीमधून कुठलीही सुचना टीप्पणी नसल्यामुळे सदर सुनावणीचे समन्वयक यांनी संबंधितांचे आभार मानले व सदर जाहीर लोक सुनावणीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर सुनावणीचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

सो.म. कुरमुडे
(समन्वयक)
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, परभणी.

महेश वडदकर
(अध्यक्ष)
तथा
अति. जिल्हादंडाधिकारी, परभणी.

**जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी (महाराष्ट्र शासन), यांनी प्रस्तावित केलेल्या परभणी जिल्हयातील मानवत तालुक्यातील शेवडी जहांगीर, कुंभारी सोनपेठ तालुक्यातील वाडीपिंपळगांव, लासीना तसेच पाथ्री तालुक्यातील डाकुपिंपरी येथील प्रस्तावित असलेल्या वाळूघाटाच्या संदर्भात दिनांक २३/११/२०२१ रोजी सकाळी ११:०० वा. तहसिल कार्यालय पाथ्री, ता. पाथ्री, जि. परभणी येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्तांत :**

---

जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी(महाराष्ट्र शासन), यांनी प्रस्तावित केलेल्या परभणी जिल्हयातील मानवत तालुक्यातील शेवडी जहांगीर, कुंभारी सोनपेठ तालुक्यातील वाडीपिंपळगांव, लासीना तसेच पाथ्री तालुक्यातील डाकुपिंपरी येथील प्रस्तावित असलेल्या वाळूघाटाच्या संदर्भात दिनांक २३/११/२०२१ रोजी सकाळी ११:०० वा. तहसिल कार्यालय पाथ्री, ता. पाथ्री, जि. परभणी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात आली होती.

जाहीर लोकसुनावणीसाठी खालील समिती सदस्य उपस्थित होते.

१. **श्री. महेश वडदकर**
निवासी उप जिल्हाधिकारी परभणी.
तथा
अप्पर जिल्हादंडाधिकारी, परभणी : अध्यक्ष

२. **श्री. सो.म. कुरमूडे**
उप-प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, परभणी : समन्वयक

परभणी जिल्हयातील मानवत, सोनपेठ व पाथ्री तालुक्यात प्रस्तावित असलेल्या वाळुघाटाच्या पर्यावरण विषयक मंजूरीसाठी जाहीर लोक सुनावणीसाठी मा. जिल्हाधिकारी, परभणी यांनी त्यांचे प्रतिनिधी म्हणून श्री. महेश वडदकर, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अति. जिल्हादंडाधिकारी, परभणी यांची नियुक्ती करून त्यांच्या अध्यक्षतेखाली सदर सुनावणीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सुचविले. त्या नुसार सदर सुनावणी मा. निवासी उपजिल्हाधिकारी,

परभणी यांचे अध्यक्षतेखाली दि. २३ नोव्हेंबर २०२१ रोजी सकाळी ११-०० वाजता तहसिल कार्यालय पाथ्री येथे आयोजित करण्यात आली होती.

श्री. सो.म. कुरमुडे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ परभणी तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करुन जनसुनावणी समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली. भारत सरकार, पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसुचना क्रं. एस.ओ.१५३३ दि. १४/०९/२००६ (दि. ०१/१२/२००९ सुधारित) नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका टिप्पणी आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोकसुनावणीचे आयोजन केले असल्याचे नमूद केले. तसेच जिल्हा खनिकर्म अधिकारी, परभणी यांचा, परभणी जिल्हयातील वाळू घाटाबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दि. १४/१०/२०२१ रोजी प्राप्त झाला होता. त्याअनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, परभणी यांनी सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी तहसिल कार्यालय, पाथ्री येथे घेण्याबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने आजची जाहीर लोक सुनावणी घेण्यात येत आहे. सदर बाबतची जाहीर सुचना दि. २०/१०/२०२१ रोजीच्यो दै. सकाळ (मराठी) व द टाईम्स ऑफ इंडीया (इंग्रजी) या वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आली होती. सदर वाळूघाटांच्या परिसरामधील रहिवाशी, पर्यावरण विषयी काम करणा-या संस्था, विस्तापित होणारे किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सुचना, टिका टिप्पणी लेखी स्वरुपात ३० दिवसांपर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, परभणी येथे लिखीत स्वरूपात पाठविण्याचे वा इमेलद्वारे पाठविण्याचे नमुद करण्यात आले होते.

सदर प्रकल्पाविषयी व पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या सारांशाची माहिती असलेले दस्तऐवज (मराठी व इंग्रजी) मध्ये खालील कार्यालयामध्ये उपलब्ध करुन देण्यात आले होते.

- जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी.
- जिल्हा उदयोग केंद्र, परभणी.
- जिल्हा परिषद, परभणी.
- तहसिलदार, तहसिल कार्यालय मानवत, सोनपेठ व पाथ्री.

- ग्रामपंचायत कार्यालय - तालुका मानवत- शेवडी जहांगीर व कुंभारी, तालुका सोनपेठ- वाडीपिंपळगांव व लासीना, तालुका पाथ्री – डाकुपिंपरी.
- उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, परभणी.
- प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, औरंगाबाद.
- (मुख्यालय),महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ मुंबई.
- पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
- प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नागपूर.

श्री. सो.म. कुरमुडे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ परभणी तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी नमुद केले की, सदर जाहीर सुचनेस अनुसरुन अदयाप पर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ परभणी यांचेकडे वाळूघाटाबाबत कुठलेही आक्षेप, टिका टिप्पणी, तोंडी किंवा लेखी स्वरुपात (इमेलद्वारे) प्राप्त झालेले नाहीत. त्यांनी सांगितले की, जर कूणाला सदर प्रकल्पासंबंधी पर्यावरण विषयक काही विचार, सुचना टिप्पणी, इ. नोंदवायचे असतील तर ते इथे सूध्दा आज मौखीक अथवा लिखित स्वरूपात नोंदवू शकतात. प्रश्न फक्त पर्यावरण विषयकच विचारले जावेत अशी त्यांनी विनंती केली. जेणेकरून प्रकल्प प्रवर्तकातर्फे समाधानकारकरित्या योग्य मार्गदर्शन केले जाईल व शंकांचे निरसन केले जाईल व त्याची इतिवृतामध्ये नोंद घेतली जाईल आणि सदर जाहीर लोकसूनावणीच्या चित्रफितीसहीत ते पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन येथे पूढिल योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल. त्यानंतर सदर जाहीर लोकसूनावणीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने, त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्यास विनंती केली.

त्यास अनुसरुन प्रकल्पाचे प्रतिनिधी मे. मंत्राज ग्रीन रिसोर्सेस लि. नाशिक चे श्री. रामेश्वर कुंडलिक बोरकर, प्रकल्प सल्लागार यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की, प्रकल्पाचा तपशील, पर्यावरणीय प्रदूषण, योजना साधने, करण्यात येणा-या उपाय योजना इं. समावेश होता. आणि पूढे सांगितले की, महाराष्ट्र शासन पत्र क्रमांक संकीर्ण- २०१९/ पी.के.०१/ता.के. ३ दि. ३ डिसेंबर, २०१९ अन्वये ५ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्राच्या खाणींसाठी सार्वजनिक सुनावणी घ्यावी लागते. परभणी जिल्हयातील मानवत, सोनपेठ व पाथ्री

तालुक्यात प्रस्तावित असलेल्या वाळूघाटासाठी पर्यावरणविषयक मंजूरी मागविण्यात आली आहे. सदर मायनिंगमध्ये ड्रिलिंग आणि ब्लास्टिंगविना ओपनकास्ट मॅन्युअल पध्दतीचा अवलंब करण्यात येईल. केवळ कुदळ, घमेले यासारख्या हातांच्या साधनांचा उपयोग केला जाईल. केवळ कोरडया नदीच्या पात्रातून वाळू उत्खनन केले जाईल. वायू प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू वाहतुकीसाठी वापरल्या जाणा-या कच्च्या रोडवर नियमित पाणी शिंपडले जाईल. टॅक्टर ट्रॉली द्वारे वाळूची वाहतूक ताडपत्रीने झाकुन करण्यात येईल. ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी खाणकाम आणि वाळू वाहतुक केवळ दिवसाच्या वेळीच केली जाईल. जल प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू उत्खनन केवळ कोरडया नदीच्या बेडवरच केले जाईल. खाण खडयाची खोली नदीच्या पाण्याच्या पातळीवरच ठेवली जाईल. निष्क्रीय वाहिन्या तयार करण्यासाठी नदीचे प्रवाह वळविले जाणार नाहीत, नदीत वाहने धुण्यास मनाई करण्यात येईल, खाणकामातून कोणतेही सांडपाणी तयार होणार नाही याची काळजी घेण्यात येईल. कामगारांना मोबाईल टॉयलेटची सोय करण्यात येईल, पावसाळयात आणि पूरात उत्खनन टाळले जाईल यामुळे वाळू उपसा पुन्हा भरु शकेल. जमीनीचे पर्यावरण राखण्यासाठी  खाणकाम परवानगी घेण्याच्या क्षमतेपेक्षा जास्त होणार नाही, नदीकाठ आणि जवळपास मोकळया जागांवर वृक्षारोपन विकसित केले जाईल. व्यावसायीक आरोग्य सुरक्षा व्यवस्थापनासाठी खाण चालकांना वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे दिली जातील. खाण साईटवर प्रथमोपचार किट प्रदान केले जाईल. पर्यावरणाची हानी होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. तसेच वाळूघाटावर सीसीटीवी कॅमेरे बसविण्यात येतील.

सदर वाळुघाटाची माहिती खालील प्रमाणे आहे.

**<u>तालुका मानवत-</u>**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | खासरा क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र (हे) | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | शेवडी जहांगीर | खासरा क्रं. ९४,९५,९६ १५० | ५००x२०x०.५० | १.०० | १७६७ |
| २ | कुंभारी | खासरा क्रं. १,१०,१३,१४,४९ | ६००x४०x०.५५ | २.४० | ४६६४ |

**तालुका सोनपेठ-**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | खासरा क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र (हे) | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | लासीना | खासरा क्रं. २६४,२७०,२७१,२७६,२७७,२७८,२७९,३००,३०९,५,६,८,७,१३,१५,३५,३६,५०,३७,५१,५२,५४ | ९५०x३०x०.६० | २.८५ | ६०४२ |
| २ | वाडीपिंपळगांव | खासरा क्रं. १,४,५,१२ गायरान | ४००x३०x१.०० | १.२० | ४२४० |

**तालुका पाथ्री-**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | खासरा क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र (हे) | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | डाकुपिंपरी | खासरा क्रं.. ९३, ८९, ९९, १११, ११६, ११७, १३९, १४०, १४१, १४४, १४५, ९२ | ५२०x३५x१.०० | १.८२ | ६४३१ |

सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डींग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तांतात नोंद करण्यात आली आहे.

प्रस्तावित प्रकल्पा विषयीचे सादरीकरण झाल्यानंतर श्री. सो.म. कुरमुडे, समन्वयक यांनी उपस्थितांना आपल्या लेखी/तोंडी काही टिका टिप्पणी असतील तर त्या मांडाव्यात जेणेकरुन पर्यावरण विषयक जनसुनावणीच्या इतिवृत्तात त्याची नोंद घेणे शक्य होईल असे नमुद केले. तसेच प्रथम आपण आपले नांव, गावाचे नाव सांगावे नंतर आपले काय म्हणणे आहे ते या ठिकाणी नोंदवावे अशी विनंती केली.

सदर जाहीर लोकसुनावणी दरम्यान परभणी जिल्हयातील मानवत, सोनपेठ व पाथ्री तालूक्यातील संबंधीत भागातील सार्वजनिक सहभार्गीनी सदर प्रकल्पासंबंधित काही प्रश्न उपस्थित केले ते खालील प्रमाणे आहेत.

१. **श्री. नंदकुमार माणिकराव चौधरी, सरपंच, कुंभारी, ता. मानवत, जि. परभणी** यांनी सांगितले की, वाळूच्या वाहतूकीमूळे रस्ते खराब होता तरी वाळूची वाहतूक गावाबाहेरील रस्त्यावरून करण्यात यावी.

श्री. रामेश्वर कुंडलिक बोरकर, प्रकल्प सल्लागार यांनी माहिती विशद करतांना सांगीतले की, धुळ उडणार नाही या करीता वेळोवेळी वाळुची वाहतुक करणा-या रस्त्यावर वाहनाव्दारे पाणी फवारण्यात येईल. तसेच उपलब्द असल्यास पर्यायी रस्त्यांचा देखील वापर करण्यात येईल.

२. **श्री शिवाजी घोरपडे, माजी सरपंच, कुंभारी, ता. मानवत, जि. परभणी**

यांनी सांगितले की, सामाजिक वनीकरणामार्फत झाडे लावा, रस्ता बाहेरुन गायरान जमिनीमधुन काढावा जेणेकरुन त्याचा गावक-यांना धुळीचा त्रास होणार नाही . आता पर्यंत वाळु लिलाव झाले परंतु त्याचा कुठलाही फंड ग्रामपंचायत कार्यालयाला मिळालेला नाही.

श्री महेश वडदकर, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांनी सांगीतले की, ग्रामपंचायतीने झाडांची संवर्धनाची जबाबदारी घ्यावी. वाळुघाटाची ठिकाणी व रस्त्यावर सीसीटीवी कॅमेरे लावण्यात येतील. कायदेशीर कारवाई करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय व तहसिल कार्यालय यांच्या मार्फत समिती स्थापन करण्यात आलेली आहे. वाळुची वाहतुक होत असतांना लिलावधारक व वाहनधारकांना गावातील नागरीकांनी सहकार्य करावे. वाळु घाटावरुन वाळु नेत असतांना पर्यायी रस्त्याचा वापर करण्यात येईल त्यासाठी निधी राखीव ठेवण्यात आलेला आहे. गावातील रस्त्यावरुन वाहन जाणार नाहीत याची दक्षता घेतली जाईल.

३. **श्री गणेश राजाभाऊ वारकरे:- डाकुपिंपरी, ता.पाथ्री, जि. परभणी.**

यांनी सांगितले की, वाळू वाहतूकीसाठी रस्ता गावाबाहेरुन काढावा जेणेकरुन गावाला धुळीचा त्रास होणार नाही.

श्री. रामेश्वर कुंडलिक बोरकर, प्रकल्प सल्लागार यांनी सांगीतले की, वाळु घाटावरुन वाळु नेत असतांना पर्यायी रस्त्याचा वापर करण्यात येईल.

४. **श्री व्यंकट काशिनाथ गित्ते, कुंभारी, ता.मानवत, जि. परभणी**

यांनी सांगितले की, वाळू वाहतूकीमूळे धुळीचा त्रास होतो त्यामुळे रस्ता गावाबाहेरुन काढावा

श्री महेश वडदकर, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांनी सांगीतले की, वाळुची वाहतुक होत असतांना लिलावधारक व वाहनधारकांना

गावातील नागरीकांनी सहकार्य करावे. वाळु घाटावरुन वाळु नेत असतांना पर्यायी रस्त्याचा वापर करण्यात येईल.

**५. श्री. सुनंदा रेडडी, हैद्राबाद**

यांनी काही सल्ले व काहीबाबतीत इंग्रजी भाषेत सांगितले.

श्री महेश वडदकर, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांनी सांगीतले की, आपण आपले मूददे लिखीत स्वरूपात समितीस सादर करावे तथापी श्री. सुनंदा रेडडी यांनी दिलेले नाहीत.

श्री महेश वडदकर, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांनी सांगीतले की, उत्खनन करत असताना लिलावधारकाने नियम व अटी लागू केलेल्या आहेत त्याचे तंतोतंत पालण करावे व त्यानूसार वाळू उत्खनन करावी तसेच वाहतूकीमूळे गावातील रस्ते खराब होणार नाहीत व वाहतूकीमूळे उडणारी धूळ निर्माण होणार नाही. तसेच झाडे लावण्याविषयी असे सांगितले की, कंत्राटदार यांच्यामार्फत झाडे न लावता ते ग्रामपंचयात कडून लावावीत जेणेकरून झाडांची संगोपन, देखभाल ग्रामपंचायत कार्यालयाकडून करता येणे शक्य होईल.

श्री. सो.म. कुरमुडे, यांनी उपस्थितांना विचारले की, अजुनही कोणाला कांही सुचना, आक्षेप मांडावयाचे असतील तर ते मांडू शकतात. परंतु सहभागीमधून कुठलीही सुचना टीप्पणी नसल्यामुळे सदर सुनावणीचे समन्वयक यांनी संबंधितांचे आभार मानले व सदर जाहीर लोक सुनावणीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर सुनावणीचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

**सो.म. कुरमुडे**
(समन्वयक)
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, परभणी.

**महेश वडदकर**
(अध्यक्ष)
तथा
अति. जिल्हादंडाधिकारी, परभणी.

**जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी (महाराष्ट्र शासन), यांनी प्रस्तावित केलेल्या परभणी जिल्हयातील सेलु तालुक्यातील पिंपरी बु., खादगांव व सोन्ना येथील प्रस्तावित असलेल्या वाळूघाटाच्या संदर्भात दिनांक २३/११/२०२१ रोजी दुपारी ०३:३० वा. तहसिल कार्यालय सेलु, ता. सेलु, जि. परभणी येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्तांत :**

..........................................................................................................................................

जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी(महाराष्ट्र शासन), यांनी प्रस्तावित केलेल्या परभणी जिल्हयातील सेलु तालुक्यातील पिंपरी बु., खादगांव व सोन्ना येथील प्रस्तावित असलेल्या वाळूघाटाच्या संदर्भात दिनांक २३/११/२०२१ रोजी दुपारी ०३:३० वा. तहसिल कार्यालय सेलु, ता. सेलु, जि. परभणी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात आली होती.

जाहीर लोकसुनावणीसाठी खालील समिती सदस्य उपस्थित होते.

१. **श्री. महेश वडदकर**
निवासी उप जिल्हाधिकारी परभणी.
तथा
अप्पर जिल्हादंडाधिकारी, परभणी : अध्यक्ष

२. **श्री. सो.म. कुरमूडे**
उप-प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, परभणी : समन्वयक

परभणी जिल्हयातील सेलु तालुक्यात प्रस्तावित असंलेल्या वाळुंघाटाच्या पर्यावरण विषयक मंजूरीसाठी जाहीर लोक सुनावणीसाठी मा. जिल्हाधिकारी, परभणी यांनी त्यांचे प्रतिनिधी म्हणून श्री. महेश वडदकर, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अति. जिल्हादंडाधिकारी, परभणी यांची नियुक्ती करून त्यांच्या अध्यक्षतेखाली सदर सुनावणीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सुचविले. त्या नुसार सदर सुनावणी मा. निवासी उपजिल्हाधिकारी, परभणी यांचे अध्यक्षतेखाली दि. २३ नोंव्हेबर २०२१ रोजी दुपारी ०३:३० वाजता तहसिल कार्यालय सेलु येथे आयोजित करण्यात आली होती.

श्री. सो.म. कुरमुडे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ परभणी तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करुन जनसुनावणी समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली. भारत सरकार, पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसुचना क्रं. एस.ओ.१५३३ दि. १४/०९/२००६ (दि. ०१/१२/२००९ सुधारित) नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका टिप्पणी आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोकसुनावणीचे आयोजन केले असल्याचे नमूद केले. तसेच जिल्हा खनिकर्म अधिकारी, परभणी यांचा, परभणी जिल्हयातील वाळू घाटाबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दि. १४/१०/२०२१ रोजी प्राप्त झाला होता. त्याअनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, परभणी यांनी सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी तहसिल कार्यालय, सेलु येथे घेण्याबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने आजची जाहीर लोक सुनावणी घेण्यात येत आहे. सदर बाबतची जाहीर सुचना दि. २०/१०/२०२१ रोजीच्यो दै. सकाळ (मराठी) व द टाईम्स ऑफ इंडीया (इंग्रजी) या वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आली होती. सदर वाळूघाटांच्या परिसरामधील रहिवाशी, पर्यावरण विषयी काम करणा-या संस्था, विस्तापित होणारे किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सुचना, टिका टिप्पणी लेखी स्वरुपात ३० दिवसांपर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, परभणी येथे लिखीत स्वरूपात पाठविण्याचे वा इमेलद्वारे पाठविण्याचे नमुद करण्यात आले होते.

सदर प्रकल्पाविषयी व पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या सारांशाची माहिती असलेले दस्तऐवज (मराठी व इंग्रजी) मध्ये खालील कार्यालयामध्ये उपलब्ध करुन देण्यात आले होते.

- जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी.
- जिल्हा उदयोग केंद्र, परभणी.
- जिल्हा परिषद, परभणी.
- तहसिलदार, तहसिल कार्यालय सेलू.
- ग्रामपंचायत कार्यालय - तालुका सेलु - पिंपरी (बु), खादगांव व सोन्ना;
- उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, परभणी.
- प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, औरंगाबाद.
- (मुख्यालय),महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ मुंबई.
- पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.

- प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नागपूर.

श्री. सो.म. कुरमुडे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ परभणी तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी नमुद केले की, सदर जाहीर सुचनेस अनुसरुन अदयाप पर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ परभणी यांचेकडे वाळूघाटाबाबत कुठलेही आक्षेप, टिका टिप्पणी, तोंडी किंवा लेखी स्वरुपात (इमेलद्वारे) प्राप्त झालेले नाहीत. त्यांनी सांगितले की, जर कूणाला सदर प्रकल्पासंबंधी पर्यावरण विषयक काही विचार, सुचना टिप्पणी, इ. नोंदवायचे असतील तर ते इथे सूध्दा आज मौखीक अथवा लिखित स्वरूपात नोंदवू शकतात. प्रश्न फक्त पर्यावरण विषयकच विचारले जावेत अशी त्यांनी विनंती केली. जेणेकरून प्रकल्प प्रवर्तकातर्फे समाधानकारकरित्या योग्य मार्गदर्शन केले जाईल व शंकांचे निरसन केले जाईल व त्याची इतिवृतामध्ये नोंद घेतली जाईल आणि सदर जाहीर लोकसूनावणीच्या चित्रफितीसहीत ते पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन येथे पूढिल योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल. त्यानंतर सदर जाहीर लोकसूनावणीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने, त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्यास विनंती केली.

त्यास अनुसरुन प्रकल्पाचे प्रतिनिधी मे. मंत्राज ग्रीन रिसोर्सेस लि. नाशिक चे श्री. रामेश्वर कुंडलिक बोरकर, प्रकल्प सल्लागार यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की, प्रकल्पाचा तपशील, पर्यावरणीय प्रदूषण, योजना साधने, करण्यात येणा-या उपाय योजना इं. समावेश होता. आणि पूढे सांगितले की, महाराष्ट्र शासन पत्र क्रमांक संकीर्ण- २०१९/ पी.के.०१/ता.के. ३ दि. ३ डिसेंबर, २०१९ अन्वये ५ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्राच्या खाणींसाठी सार्वजनिक सुनावणी घ्यावी लागते. परभणी जिल्हयातील सेलु तालुक्यात प्रस्तावित असलेल्या वाळूघाटासाठी पर्यावरणविषयक मंजूरी मागविण्यात आली आहे. सदर मायनिंगमध्ये ड्रिलिंग आणि ब्लास्टिंगविना ओपनकास्ट मॅन्युअल पध्दतीचा अवलंब करण्यात येईल. केवळ कुदळ, घमेले यासारख्या हातांच्या साधनांचा उपयोग केला जाईल. केवळ कोरडया नदीच्या पात्रातून वाळू उत्खनन केले जाईल. वायू प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू वाहतुकीसाठी वापरल्या जाणा-या कच्च्या रोडवर नियमित पाणी शिंपडले जाईल. टॅक्टर ट्रॉली द्वारे वाळूची वाहतूक ताडपत्रीने झाकुन करण्यात येईल. ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी खाणकाम आणि वाळू वाहतुक

केवळ दिवसाच्या वेळीच केली जाईल. जल प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू उत्खनन केवळ कोरडया नदीच्या बेडवरच केले जाईल. खाण खडयाची खोली नदीच्या पाण्याच्या पातळीवरच ठेवली जाईल. निष्क्रीय वाहिन्या तयार करण्यासाठी नदीचे प्रवाह वळविले जाणार नाहीत, नदीत वाहने धुण्यास मनाई करण्यात येईल, खाणकामातून कोणतेही सांडपाणी तयार होणार नाही याची काळजी घेण्यात येईल. कामगारांना मोबाईल टॉयलेटची सोय करण्यात येईल, पावसाळयात आणि पूरात उत्खनन टाळले जाईल यामुळे वाळू उपसा पुन्हा भरु शकेल. जमीनीचे पर्यावरण राखण्यासाठी खाणकाम परवानगी घेण्याच्या क्षमतेपेक्षा जास्त होणार नाही, नदीकाठ आणि जवळपास मोकळया जागांवर वृक्षारोपन विकसित केले जाईल. व्यावसायीक आरोग्य सुरक्षा व्यवस्थापनासाठी खाण चालकांना वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे दिली जातील. खाण साईटवर प्रथमोपचार किट प्रदान केले जाईल. पर्यावरणाची हानी होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

सदर वाळुघाटाची माहिती खालील प्रमाणे आहे.

<u>तालुका सेलु-</u>

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | खासरा क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र (हे) | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपरी बु. | खासरा क्रं. १०८, १०९, ११, ११२ | ४५०x२५x०.४५ | १.१२ | १७८९ |
| २ | खादगाव | खासरा क्रं.२१, २३ ,२६, २७, २८, २९, ३० | ५००x२०x०.६० | १.०० | २१२० |
| ३ | सोन्ना | खासरा क्रं. १५४, १५५, १५६, १५७, १६२, १६३, १६४, १६५ | ७००x२५x०.५० | १.७५ | ३०९२ |

सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डीग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तांतात नोंद करण्यात आली आहे.

प्रस्तावित प्रकल्पा विषयीचे सादरीकरण झाल्यानंतर श्री. सो.म. कुरमुडे, समन्वयक यांनी उपस्थितांना आपल्या लेखी/तोंडी काही टिका टिप्पणी असतील तर त्या मांडाव्यात जेणेकरुन पर्यावरण विषयक जनसुनावणीच्या इतिवृत्तात त्याची नोंद घेणे शक्य होईल असे नमुद केले. तसेच प्रथम आपण आपले नांव, गावाचे नाव सांगावे नंतर आपले काय म्हणणे आहे ते या ठिकाणी नोंदवावे अशी विनंती केली.

सदर जाहीर लोकसुनावणी दरम्यान परभणी जिल्हयातील सेलू तालूक्यातील संबंधीत भागातील सार्वजनिक सहभागींनी सदर प्रकल्पासंबंधित काही प्रश्न उपस्थित केले ते खालील प्रमाणे आहेत.

१. **श्री. मयुर माणिकराव वाघ, उपसरपंच, पिंपरी बु., ता. सेलु, जि. परभणी** यांनी विचारले की, वाळु लिलाव झाल्यास ग्रामपंचायत कार्यालयास काही लाभ होईल की नाही व आतापर्यंत कुठलाही फंड ग्रामपंचायत कार्यालयाला मिळालेला नाही.

श्री महेश वडदकर, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांनी सांगीतले की, वाळु घाटावरुन वाळु नेत असतांना पर्यायी रस्त्याचा वापर करण्यात येईल त्यासाठी निधी राखीव ठेवण्यात आलेला आहे. गावातील रस्त्यावरुन वाहन जाणार नाहीत याची दक्षता घेतली जाईल. तसेच मागील निधीबाबत त्यांनी सांगितले की, जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावर चौकशी करुन ग्रामपंचायतीला निधी देण्यात येईल. तसेच यापूढे नियमानूसार वाळूचा लिलाव झाल्यानंतर यांबाबतचा फंड सरळ ग्रामपंचायत कार्यालयाला देण्यात येईल.

२. **श्री आनंता ज्ञानोबा भाबट, खादगाव, ता. सेलु, जि. परभणी**

यांनी विचारले की, आता पर्यंत वाळु लिलाव झाले परंतु त्याचा कुठलाही फंड आलेला नाही.

श्री. रामेश्वर कुंडलिक बोरकर, प्रकल्प सल्लागार यांनी सांगीतले की, यापूढे नियमानूसार वाळूचा लिलाव झाल्यानंतर यांबाबतचा फंड सरळ ग्रामपंचायत कार्यालयाला देण्यात येईल. तसेच विविध कामासाठी निधी राखीव ठेवण्यात आलेला आहे.

श्री महेश वडदकर, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांनी सांगीतले की, ग्रामपंचायतकडे नीधी देण्यात येतो तथापी याबाबत जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावर चौकशी करुन ग्रामपंचायतीला निधी देण्यात येईल.

३. **श्री प्रमोद प्रल्हाद गायके, खादगाव, ता. सेलु, जि. परभणी :-**

यांनी विचारले की, आतापर्यंत कुठलाही फंड आलेला नाही.

श्री महेश वडदकर, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांनी सांगीतले की, याबाबत जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावर चौकशी करुन ग्रामपंचायतीला निधी देण्यात येईल.

श्री महेश वडदकर, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांनी सांगीतले की, उत्खनन करत असताना लिलावधारकाने नियम व अटी लागू केलेल्या आहेत त्याचे तंतोतंत पालण करावे व त्यानूसार वाळू उत्खनन करावी तसेच वाहतूकीमूळे गावातील रस्ते खराब होणार नाहीत व वाहतूकीमूळे उडणारी धूळ निर्माण होणार नाही. तसेच झाडे लावण्याविषयी असे सांगितले की, कंत्राटदार यांच्यामार्फत झाडे न लावता ते ग्रामपंचयात कडून लावावीत जेणेकरून झाडांची संगोपन, देखभाल ग्रामपंचायत कार्यालयाकडून करता येणे शक्य होईल.

श्री. सो.म. कुरमुडे, यांनी उपस्थितांना विचारले की, अजुनही कोणाला कांही सुचना, आक्षेप मांडावयाचे असतील तर ते मांडू शकतात. परंतु सहभागीमधून कुठलीही सुचना टीप्पणी नसल्यामुळे सदर सुनावणीचे समन्वयक यांनी संबंधितांचे आभार मानले व सदर जाहीर लोक सुनावणीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर सुनावणीचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

**सो.म. कुरमुडे**
(समन्वयक)
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, परभणी.

**महेश वडदकर**
(अध्यक्ष)
तथा
अति. जिल्हादंडाधिकारी, परभणी.